# ICICI Home Finance
## Fixed Deposits

MAAA
"Highest credit quality rating by ICRA"

AAA
"CARE AAA (FD)" by CARE#

## आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड


नोंदणीकृत कार्यालय : आयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई–400 051.
कॉर्पोरेट कार्यालय : आरपीजी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, जेबी नगर, अंधेरी पूर्व, मुंबई–400 059.
CIN: U65922MH1999PLC120106. Website: www.icicihfc.com. Email: customer.care@icicihfc.com


ठेवी करीता आधारभूत व्याजचा दर (% वार्षिक)

| मुदत | वार्षिक/क्युम्युलेटिव्ह इन्कम योजना | त्रैमासिक इन्कम योजना | मासिक इन्कम योजना |
|---|---|---|---|
| 12–23 महिने | 7.35% | 7.15% | 7.10% |
| 24–35 महिने | 7.45% | 7.25% | 7.20% |
| 36–47 महिने | 7.40% | 7.20% | 7.15% |
| 48–60 महिने | 7.40% | 7.20% | 7.15% |
| ज्येष्ठ नागरीकांसाठी दर साल अतिरिक्त 0.25% | | | |

- 12 ते 60 महिन्या पर्यंत कितीही महिन्यासाठी ठेवी ठेवता येतील.

ठेवींसाठी व्याजदराची विशेष योजना (% वार्षिक)

| मुदत | वार्षिक/क्युम्युलेटिव्ह इन्कम योजना | त्रैमासिक इन्कम योजना | मासिक इन्कम योजना |
|---|---|---|---|
| 12 महिने | 7.40% | 7.20% | 7.15% |
| 15 महिने | 7.60% | 7.40% | 7.35% |
| 20 महिने | 7.60% | 7.40% | 7.35% |
| 30 महिने | 7.55% | 7.35% | 7.30% |
| 35 महिने | 7.55% | 7.35% | 7.30% |
| 40 महिने | 7.55% | 7.35% | 7.30% |
| 60 महिने | 7.55% | 7.35% | 7.30% |
| ज्येष्ठ नागरीकांसाठी दर साल अतिरिक्त 0.25% | | | |

टिपणी :
- दरवर्षी चक्रवाढ दराने व्याज दिले जाईल.
- वरिल दर हे ₹ 1 कोटी पर्यंतच्या रक्कमेवर 24 एप्रील 2018 पासून लागू होतील.
- 1 कोटी रूपयांपेक्षा अधिक ठेवींसाठीचा दर प्रत्येक प्रकरणानुसार दिला जाईल.
- व्याजदरात बदल करणे हे आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडच्या पूर्ण अखत्यारीत आहेत व कायदेशीरही आहेत आणि ते व्याजदर ठेव ठेवलेल्या तारखेपासून लागू होतील.

क्रेडिट मानांकन : आयसीआयसीआय होम फायनान्स फिक्स्ड डिपॉझिटला, CARE द्वारे "AAA" आणि ICRA द्वारे "MAAA" असे सर्वोत्तम क्रेडिट मानांकन प्राप्त झालेले आहे.

### महत्वाच्या अटी व शर्ती

आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड (दि 'कंपनी') तिच्या अखत्यारीत खालील अटी व शर्तीच्या आधिन राहून आयसीआयसीआय होम फायनान्स फिक्सड् डिपोझीट स्किम (दि 'स्किम') च्या अंतर्गत मुदत ठेवींचा स्वीकार करील. या ठेवींचा विमा केलेला नाही.

1) परिमाण : प्रत्येक पर्यायातील मुदत ठेवी ह्या व्यक्तिशः गुंतवणूकदार/गुंतवणूकदारांसाठी खाली नमुद केलेल्या निरनिराळ्या इन्कम प्लान अंतर्गत असलेल्या ठेवीच्या किमान रकमेनूसार स्विकारल्या जातील.
- किमान ₹ 10,000/– वार्षिक/क्युम्युलेटिव्ह इन्कम प्लान अंतर्गत
- किमान ₹ 20,000/– त्रैमासिक इन्कम प्लान अंतर्गत
- किमान ₹ 40,000/– मासिक इन्कम प्लान अंतर्गत
- कोणतीही अतिरिक्त रक्कम ₹ 1/– च्या पटीत असणे आवश्यक.
- जर मुदतठेव पूढे वाढवायची असेल तर किमान ₹ 5,000/– आणि अतिरिक्त रक्कम ₹ 1/– च्या पटीत असावी.

2) पेमेंट (देयक)विषयक सूचनाः धनादेश/ डिमांड ड्राफ्ट (DD) 'ICICI Home Fin - FD A/c' च्या नावाने काढावा व त्यावर 'Account Payee only' अशी नोंद करावी. अर्जदाराचे नाव ('ॲप्लिकंट') धनादेश/डीडीच्या मागच्या बाजूस लिहिलेले असावे. धनादेश/डीडी हा आयसीआयसीआय बँक लोकेशनवर पेयबल राहील. जेथे ठेवीचे अर्ज स्विकारले जातील तेथेच हे धनादेश/डिमांड ड्राफ्ट द्यावेत. क्लिअरिंगकरिता केवळ स्थानिक धनादेश स्वीकारण्यात येतील. प्रत्येक अर्जासोबत एक वेगळा धनादेश/डीडी जोडावा. बाहेरील ठेवीदार/डिपॉझिटर्सनी डीडी शुल्क वगळून डिमांड ड्राफ्ट पाठवावा. डीडी हा आयसीआयसीआय बँक लोकेशनवर पेयबल असावा. व्याज आणि रिडमशन प्रक्रियेसाठी धनादेश/डीडी 'ॲट पार' जारी करण्याचे अधिकार कंपनीचे असतील.

3) अर्ज जमा करणेः फिक्स्ड डिपॉझीटचा अर्ज, केव्हायसी अर्ज, कंपनीच्या धोरणानुसार दस्तऐवज आणि धनादेश/डीडी हे स्थानिक/नजीकच्या शाखेत/कंपनीच्या कॉर्पोरेट ऑफिसमध्ये पोहोचवावे.

4) देण्यात येणारे व्याज : सर्व ठेवीसाठी धनादेश/डीमांड ड्राफ्ट वठलेल्या तारखेपासून /धनराशी कंपनीच्या खात्यात आल्या तारखेपासून व्याज देण्यात येईल. मासिक इन्कम प्लान, तिमाही इन्कम प्लान आणि वार्षिक इन्कम प्लान अंतर्गत ठेवलेल्या ठेवीवरील व्याज निश्चित केलेल्या तारखेला देण्यात येईल. मासिक व्याज देण्याची तारीख ही प्रत्येक महिन्याची शेवटची तारीख असेल. तिमाही व्याज देण्याच्या निश्चित तारखा प्रत्येक वर्षी 31 मार्च, 30 जून, 30 सप्टेंबर व 31 डिसेंबर ह्या आहेत. वार्षिक इन्कम प्लान अंतर्गत वर्षातून एकदा, आर्थिक वर्ष संपल्या नंतर व्याज देण्यात येईल. कृपया लक्षात घ्या की, अंशताः कालावधीसाठीचे व्याज प्रमाणानुसार (प्रो.रेटा) धर्तीवर दिली जातील. जर व्याज देण्याच्या निश्चीत तारखेआधी 20 दिवसांच्या कालावधीत ठेव ठेवली गेल्यास, अंशतः कालावधीचे व्याज, हे व्याज द्यावयाच्या पुढील तारखेस निश्चित देण्यात येईल.

क्यूम्यूलेटिव्ह इन्कम प्लान अंतर्गत, प्रत्येक वर्षाच्या 31 मार्च रोजी व्याज जमा केले जाईल आणि मुदतपूर्ती नंतर त्या ठेवीच्या परताव्या सोबत दिले जाईल. रकमेवर दिले जाणारे संबंधीत व्याज (व्याज कर असल्यामुळे रकमेतून कर वजा करून समाविष्ट केलेल्या) चक्रवाढीच्या वार्षिक धर्तीवर हिशोब केल्याप्रमाणे एकूण मुदतपूर्ती रकमेच्या अतिरिक्त नसेल.

ईसीएस/एनईएफटी/आरटीजीएस सुविधा उपलब्ध असलेल्या सर्व ठिकाणी सर्व ठेवींचे व्याज अर्जदार/ठेवीदारांना प्रामुख्याने ईसीएस/एनईएफटी/आरटीजीएस सुविधेने दिले जाईल. जिथे ईसीएस/एनईएफटी/आरटीजीएस सुविधा उपलब्ध नसतील तिथे धनादेश/डी.डी. ह्या स्वरूपात किंवा कंपनीस योग्य वाटणाऱ्या कोणत्याही पद्धतीने पैसे दिले जातील आणि ते एकटे /प्रथम अर्जदार/ठेवीदार ह्याच्या नावे "अकाउंट पेयी ओन्ली" अशी खूण करून दिले जाईल. ईसीएस/एनईएफटी/आरटीजीएस मुळे फसवणूक होण्यास आळा बसतो. प्रथम अर्जदार/ठेवीदार अल्पवयीन असल्यास त्याच्या पालकांसोबत त्याच्या नावे पैसे दिले जातील. एकटे/प्रथम ठेवीदार/अर्जदार ह्याच्या व्यतिरिक्त अन्य कुणा व्यक्तीस व्याज द्यावयाचे असल्यास संयुक्त ठेवी आणि वारसा हक्क ह्यांना लागू असलेल्या अटी व शर्ती पहा, एकटे/प्रथम अर्जदार/ठेवीदार ह्याच्या नावे काढलेले पुढील तारखेचे न वठवण्यात आलेले व्याजाचे इंस्ट्रुमेंट(इंस्ट्रुमेंटस) कंपनीकडे सपूर्द करावे लागतील.

5) फिक्स्ड डिपॉझीट रिसीट (एफडीआर):
(अ) एफडीआर हे अर्जात नमूद करण्यात आलेल्या प्रथम अर्जदार/डिपॉझीटर यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्ट किंवा कुरियरने किंवा धनादेश/डीडी/फंड कंपनीच्या खात्यात जमा झाल्यानंतर इतर पद्धतीने अग्रेषित (फॉरवर्ड) करण्यात येतील.
(ब) फिक्स्ड डिपॉझीट रिसीट या हस्तांतरित करता येणार नाहीत. तसेच त्यावर वाटाघाटी शक्य नाही. या फिक्स्ड डिपॉझीट रिसीट इतर कोणालाही देणे, हस्तांतरित करणे किंवा गहाण ठेवता येणार नाहीत. तसेच आयसीआयसीआय होम फायनान्स व्यतिरिक्त कोणत्याही कर्ज/क्रेडीट सुविधेकरता इतर पक्षांकडे सुरक्षा रक्कम म्हणून ठेवता येणार नाही.

6) दस्तऐवज हरवणे, नाश, इत्यादी.:
(अ) फिक्स्ड डिपॉझीट रिसीट, व्याज आणि परत आलेले धनादेश/डीडी हे रजिस्टर पोस्ट किंवा कुरियर किंवा कंपनीच्या मतानुसार इतर पद्धतीने अर्जात नमूद एकलध्पहिला अर्जदारधडिपॉझीटरला पाठवले जातील. डाक किंवा कुरियर सेवेमार्फत टपाल पोहोचण्यास उशीर झाल्यास किंवा दस्तऐवजांचे नुकसान झाल्यास किंवा नियंत्रणाबाहेरील परिस्थिती असल्यास कंपनी जबाबदार राहणार नाही.
(ब) फिक्स्ड डिपॉझीट रिसीट, व्याज किंवा धनादेश/ डीडीचा परतावा (रिफंड) हरवल्यास, नष्ट झाल्यास किंवा नुकसान झाल्यास कंपनीकडून फिक्स्ड डिपॉझीट रिसीट, व्याज किंवा धनादेश/ डीडीचा परतावा (रिफंड)ची नक्कल प्रत देण्यात येईल, मूळ इन्स्ट्रुमेंटच्या नॉन–एन्कॅशमेंट अधीन असेल, तसेच विहित अर्जात नमूद करण्यात आल्याप्रमाणे कंपनीला आवश्यक असलेल्या प्रक्रिया/दस्तऐवजांची पूर्तता, भरपाई ठेवीदार/ डिपॉझीटरकडून करण्यात आल्यानंतर व त्याबाबत संतुष्टी झाल्यानंतर ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

7) ठेवींचे नुतनीकरणः स्कीम सुरू होताना असलेल्या नमुन्याअधीन, जुनी ठेव परिपक्व झाल्यावर स्कीमच्या अटी आणि शर्थीनुसार ठेवीचे नुतनीकरण करावे लागेल. हे नुतनीकरण अर्ज भरताना ऑटो रिन्युअल पर्याय निवडून किंवा ठेव परिपक्व होण्यापूर्वी किमान 7 दिवसांच्या आत विनंती पत्र देऊन करता येईल. संयुक्त नावावर ठेव असल्यास विहित अर्जात नमूद केल्याप्रमाणे कार्यवहनाच्या पद्धतीप्रमाणे अर्ज भरावा.

8) ठेवीची परतफेड :
(अ) काहीही नमूद केलेले नसल्यास ठेवी परिपक्व झाल्यानंतर स्वयंचलित पद्धतीने रद्दबादल (एक्सपायर) होतील. व परिपक्व रक्कम नियोजित बँक खात्यात वळती करण्यात येईल. या कालावधीनंतर ठेव नुतनीकरण नियमातंर्गत ठेवीचे नुतनीकरण न केल्यास त्यावर व्याज दिले जाणार नाही.
(ब) ठेव परिपक्व होण्यापूर्वी किमान दोन आठवड्यांअगोदर कंपनीकडून ठेव परिपक्व होणार असल्याची सूचना कंपनीकडून ठेवीदाराला करण्यात येईल. तुमची ठेव परिपक्व होण्यापूर्वी किमान 7 कामकाजाचे दिवसात विनंती पत्र देऊन ठेवीचे नुतनीकरण करू शकता.
(क) सर्व विमोचन भरणा (रिडम्पशन पेमेंट) ही ईसीएस/एनईएफटी/धनादेश/डीडी किंवा कंपनीच्या पसंतीनुसार पर्यायाने करण्यात येईल. ते एकल/प्रथम ठेवीदाराला "A/c Payee only" नोंदवून देण्यात येईल. प्रथम अर्जदार/ ठेवीदार हा अल्पवयीन असल्यास सर्व देय प्रक्रिया अल्पवयीन व्यक्तीच्या नावावर त्याच्या पालकाच्या नावासोबत करण्यात येईल. प्रथम/एकल धारकाचे खाते आयसीआयसीआय बँकेत असल्यास थेट क्रेडीट पर्याय वापरता येईल.

9) ठेवीचा मुदतपूर्व परतावा : हाऊसिंग फायनान्स कंपनी (एनएचबी) ह्याच्या मार्गदर्शक तत्वे 2010 नुसार, ठेवी ठेवलेल्या तारखेपासून पहिल्या 3 महिन्यापर्यंत मुदतपूर्व परतावा करण्याची मुभा मिळणार नाही. मुदतपूर्व परतावा झाल्यास खालील दर लागू होतील.

| मुदतपूर्व परतावा* | देय व्याजाचे दर |
|---|---|
| 3 महिन्यानंतर परंतु 6 महिन्यापूर्वी | वैयक्तिक ठेवीदारांसाठी "देय असलेला कमाल व्याजदर 4% वार्षिक एवढा असेल" आणि अन्य संवर्गातील ठेवीदारांसाठी "व्याज नसेल". |
| 6 महिन्यानंतर परंतु 12 महिन्यापूर्वी | आयसीआयसीआय होम फायनान्स द्वारे जनतेच्या ठेवी स्विकारल्या जातात त्या किमान दरापेक्षा 2% कमी |
| 12 महिन्यानंतर परंतु मुदतपूर्तीच्या तारखेपूर्वी | आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी ने जर अशा कालावधीसाठी ठेव ठेवून घेतली असती तर ज्या दराने व्याज दिले असते त्या व्याज दरापेक्षा 1% कमी |
| ठेवीदाराचा मृत्यू झाल्यास, मुदतठेवीची मुदतपूर्व समाप्ती करायची मुभा देण्यात येईल, अशा मुदतपूर्व परताव्यासाठी कोणताही दंड आकारला जाणार नाही | |

*ठेवीच्या तारखेपासून

ठेवीदाराचा मृत्यू झाल्यास, फिक्स्ड डिपॉझीटचे अकाली खंडन (प्रीमॅच्युअर टर्मिनेशन) झाल्यास अकाली खंडनाला कोणताही दंड लागणार नाही. आपतकालीन खर्च भागविण्याकरिता इतर ठेवींसाठी, अकाली खंडन 3 महिन्यांच्या आत करण्यास संमती असेल, नियामक स्थितीअधीन. ठेवींच्या अकाली खंडनाकरिता मोडण्यात येणारी (डिस्चार्ज) एफडीआर आवश्यक किमतीचा रेव्हेन्यू स्टॅम्प लावून कंपनीकडे सुपूर्द करावा. सर्व ठेवीदारांनी विनंतीवर सही केल्यावर मोडण्यात येणारी एफडीआर जोडल्यानंतरच एकल/संयुक्त एफडीचे अकाली खंडन शक्य होईल.

10) मूळ स्त्रोत्याकडून कर वजावट (टीडीएस) : आयकर कायदा 1961 कलम 194 A मधील तरतुदींनुसार आणि त्या अनुषंगाने जर निवासी ठेवीदाराच्या/ठेवीदारांच्या खात्यात जमा केलेले/अदा केलेले व्याज किंवा जमा करण्याची/अदा शक्यता असलेले व्याज ₹ 5,000/– पेक्षा अधिक असेल, तर मुळ सुत्राकडून प्रप्तीकर वजा करण्यात येईल. अनिवासी ठेवीदारांसाठी ही सूट लागू नसेल, ज्यांच्या बाबतीत या कायद्याच्या कलम 195 नुसार मुळ सुत्राकडून प्रप्तीकर वजा केला जातो. आयकर कायदा, 1961 च्या कलम 206AA अनुसार 1 एप्रिल, 2010 पासून निवासी आणि अनिवासी ठेवीदारांसाठी, मुळ सुत्राकडून प्रप्तीकर वजा करावयाच्या करासाठी वैध पॅनकार्ड (परमनंट अकाउंट नंबर) अनिवार्य आहे. अन्यथा मूळ स्त्रोताकडील कर विहित दर किंवा 20% दर यापैकी उच्चतम दराने वजा केला जाईल.
ह्यासंबंधी अधिक तपशील अर्जाच्या फॉर्ममध्ये देण्यात आलेला आहे.

11) सर्वयसाधारण अटी :
अ) कोणतेही कारण न देता वा कोणताही अर्ज किंवा ठेवीचे नूतनिकरण नाकारण्याचा हक्क कंपनी राखून ठेवीत आहे.
ब) व्याजदरात बदल होण्याची श्क्यता आहे आणि लागू करण्यात आलेले दर हे ठेवीच्या तारखेस प्रचलित असलेले दर असतील.
क) ह्यातनमुद करण्यात आलेल्या अटी व शर्ती ह्या अर्जा मध्ये उल्लेखलेल्या अन्य सर्व अटी व शर्तीच्या जोडीने अधिक माहिती म्हणून वाचाव्यात. ड) मुदत ठेव चालवतांना कोणत्याही अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा, त्यात सुधारणा करण्याचा, त्यात भर धालण्याचा किंवा त्यातून वगळण्याचा अधिकार कंपनीला आहे व लागू असलेल्या मर्गदर्शक तत्वानुसार तशी सूचना कंपनी ठेवीदार/अर्जदाराला देईल. फिक्सड् डिपॉझिट स्किम संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास तो मुंबई न्यायालयाच्या अखत्यारीत येईल.

### वैयक्तिक अर्जदारांसाठी अटी व शर्ती :

1) संयुक्त ठेवी : कमाल 3 व्यक्तींच्या नावांनी संयुक्त ठेवी तयार करता येतील. सर्व ठेवीदारांची नावे आणि प्रथम ठेवीदाराचा पत्ता ठेवीदाराचे लेजर आणि रजिस्टरमध्ये नोंदवून ठेवावा. संयुक्त नावावरील व्याज प्रथम ठेवीदाराला कर वजावट कारणासाठी दिले जाईल, त्याच्या/तिच्यातर्फे करण्यात आलेले कोणतेही खंडन (डिस्चार्ज) हे संयुक्त ठेवीदार/ठेवीदारांना लागू असेल.

2) अलपवयीन व्यक्तीच्या नावे ठेव : अलपवयीन व्यक्तीच्या नावे असलेल्या ठेवी ह्या सदर अल्पवयीन व्यक्तीचे प्रतिनिधीत्व त्यांच्या निसर्गदत्त किंवा कायदेशीर पालकाद्वारे केले जाईल आणि त्यांच्या अर्जाच्या फॉर्मवर त्याच्या वतीने निसर्गदत्त किंवा कायदेशीर पालक स्वाक्षरी करतील. ठेवींबाबतची सर्व माहिती पालकांच्या पत्यावर पाठवली जाईल.

3) नामनिर्देशनः अर्जदार/ठेवीदार हे एकटे किंवा संयुक्तरीत्या प्रत्येक ठेवीसंदर्भात एकाच व्यक्तीचे नामनिर्देशन करू शकतात. पॉवर ऑफ ॲटर्नी होल्डर किंवा अल्पवयीन व्यक्तीच्या वतीने अर्ज करणारा पालक नामनिर्देशन करू शकणार नाही. अर्जदार/ठेवीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यानी नामनिर्देशीत केलेल्या व्यक्तीच्या स्वाक्षरीचा नमुना सादर करावा, ज्यामुळे अर्जदार/ठेवीदाराचा मृत्यू झाल्यास त्याने नामनिर्देशीत केलेल्या व्यक्तीकडे ती ठेव देण्याच्या कामाला गती मिळू शकेल. नामनिर्देशन केलेल्या व्यक्तीचे नांव ठेवीच्या पावतीवर दिले जाईल.

4) ठेवींवर कर्ज : ठेव ठेवल्याच्या तारखेपासून 3 महिन्यानंतर ठेवीवर कर्ज मिळू शकेल, ज्याबाबत आयसीआयसीआय होम फायनान्स सर्वस्वी निर्णय धेईल. सदर कर्ज ठेवीच्या रकमेच्या 75% पर्यंत दिले जाईल. त्यासाठी कंपनीने वेळोवेळी निर्देशित केलेल्या अटी व शर्ती लागू होतील. अशा कर्जावरील व्याज ठेवीच्या दरापेक्षा 2% अधिक राहील. ही कर्ज सुविधा केवळ निवासी भारतीय, एचयुएफए, भागिदारी संस्था आणि व्यवसायी कंपन्या ना लागू होतील. (अनिवासी भारतीय व अल्पवयीन ठेवीदारांना लागू नाही).

5) अनिवासी भारतीय (एन आर आय) : अनिवासी भारतीयांकडील आणि मूळ भारतीय पण भारताबाहेर वास्तव्य करून असलेल्या ठेवीदारांकडून, ठेवी त्यावर अमलात येणाऱ्या नियमानुसारच स्वीकारल्या जातील. सदर ठेवी जास्तीत जास्त 3 वर्षाच्या कालावधीसाठी स्वीकारल्या जातील. देय व्याज तसेच ठेवीची परतफेड केवळ एनआरओ खात्यातच जमा करून दिली जाईल. अनिवासी भारतीयांना लागू असलेल्या अटीनूसार मुळ स्त्रोताकडून प्राप्तीकर वजा केला जाईल.

### विना–बँकींग वित्तीय कंपन्या आणि किरकोळ विना–बँकींग कंपन्या (जाहिरात) नियम 1977 अंतर्गत आवश्यक असलेले तपशील

अ) कंपनीचे नांव : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड (ब) स्थापनेची तारीख : मे 28, 1999. (क) (1) कंपनीचा व्यवसाय : कंपनीचा प्रमुख व्यवयास हा घरे, इमारती आणि कोणत्याही स्वरूपातील रिअल इस्टेट प्राप्त करणाऱ्या कोणाही व्यक्तीस किंवा व्यक्तींना, तसेच, घरे किंवा इमारती किंवा कोणत्याही प्रकारची रिअल इस्टेट ह्याचे बांधकाम, नूतनीकरण, विकासकाम किंवा दुरूस्तीसाठी ही वित्तीय सहाय्य प्रदान करणे हा आहे. कंपनीची कोणतीही उपकंपनी नाही.

(क) (2) प्रमुख शाखा/सेवा केंद्र

| शहर/घटक राज्य | दुरध्वनी क्रमांक | शहर/घटक राज्य | दुरध्वनी क्रमांक | शहर/घटक राज्य | दुरध्वनी क्रमांक | शहर/घटक राज्य | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | 7306667777 | दिल्ली | 01133667777/ 01144455000 | कर्नाटक | 8088667777 | राजस्थान | 7877667777 |
| अहमदाबाद | 07933667777/ 07944455000 | एर्नाकूलम | 4843366777 | केरळा | 9020667777 | रायपूर | 7713366777 |
| आसाम | 9864667777 | गुजरात | 8000667777 | कोलकत्ता | 03333667777/ 03344455000 | रांची | 6513344339 |
| बेंगलूरू | 08033667777/ 08044455000 | गोवा | 9021667777 | लखनौ | 05223366777 / 05224445500 | शिमला | 1773366777 |
| भोपाळ | 7553366777 | गुरगांव | 01243366777/ 01244445500 | मध्य प्रदेश | 9098667777 | तामिळनाडू | 7305667777 |
| बिहार | 8102667777 | हॅरियाणा | 9017667777 | महाराष्ट्र | 9021667777 | तेलंगना | 7306667777 |
| भुवनेश्वर | 6743366777 | हैद्राबाद | 04033667777/ 04044455000 | मुंबई | 02233667777 / 02244455000 | उत्तर प्रदेश | 8081667777 |
| चंदिगढ | 01723366777/ 01724445500 | हिमाचल प्रदेश | 9817667777 | ओडिसा | 9692667777 | उत्तराखंड | 8081667777 |
| छत्तिसगढ | 9098667777 | जम्मू आणि काश्मिर | 9018667777 | पणजी | 8323366777 | पश्चिम बंगाल | 8101667777 |
| चेन्नई | 04433667777/ 04444455000 | जयपूर | 01413366777/ 01414445500 | पटणा | 6123366777 | | |
| देहराडून | 1353366777 | झारखंड | 8102667777 | पंजाब | 7307667777 | | |

ड) कंपनीच्या व्यवस्थापनाचे संक्षिप्त तपशिल : व्यवसायाच्या व्यवस्थापनाची अंतिम जबाबदारी ही कंपनीच्या संचालक मंडळाची आहे. श्री अनुप बागची हे मंडळाचे नॉन–एक्झिक्युटिव्ह चेअरमन आहेत. श्री श्री अनिरूध कमानी एमडी व सीईओ, ह्याच्याकडे कंपनीच्या व्यवसायाची एकूण जबाबदारी आहे.

इ) संचालकाचे नांव, पत्ता व व्यवसाय :

नांव : श्री अनुप बागची व्यवसायः नोकरी
पत्ता : आयसीआयसी बँक टॉवर्स, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई 400 051.

नांव : श्री एन आर नारायणन व्यवसायः नोकरी
पत्ता : आयसीआयसी बँक टॉवर्स, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई 400 051.

नांव : कुमारी अनिता पै व्यवसायः नोकरी
पत्ता : आयसीआयसी बँक टॉवर्स, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई 400 051.

नांव : सी.ए. श्री एस. संथानाकृष्णन व्यवसायः चार्टर्ड अकाऊटंट
पत्ता : न्यु नं. 24, अन्नामलाई अम्मल मार्ग, टी नगर, चेन्नाई 600 017.

नांव : श्री दिलीप चोक्सी व्यवसायः चार्टर्ड अकाऊटंट
पत्ता : ई–7, सी फेस पार्क, 50, भुलाभाई देसाई रोड, मुंबई 400 026.

नांव : श्री एस. संथानाकृष्णन व्यवसायः कंपनी डायरेक्टर
पत्ता : जी–5, प्राईम टेरेस, 150, एल. बी. रोड, चेन्नाई 600 041.

नांव : श्री अनिरूध कमानी व्यवसायः मॅनेजिंग डायरेक्टर व सीईओ
पत्ता : आयसीआयसी बँक टॉवर्स, बांद्रा–कुर्ला कॉमम्प्लेक्स, मुंबई 400 051.

फ) नफा व लाभांश :

| वर्ष समाप्ती | करपुर्व नफा (₹ दशलक्षामध्ये) | करपश्चात नफा (₹ दशलक्षामध्ये) | इक्विटी लाभांश घोषित (%)* |
|---|---|---|---|
| मार्च 31, 2018 | 1,119.4 | 642.5 | 3.15% |
| मार्च 31, 2017 | 2,782.7 | 1,832.6 | 11.06% |
| मार्च 31, 2016 | 2,724.2 | 1,798.5 | 12.66% |

*ज्या त्या आस्थक वर्षाच्या शेवटच्या दिवशी प्रस्तावित केल्याप्रमाणे, अंतिम लाभांश सहित

ग) शेवटच्या 2 लेखापरिक्षीत ताळेबंदांमध्ये दिसून आलेली कंपनीची संक्षिप्त वित्तीय स्थिती : (₹ दशलक्षामध्ये)

| दायित्वे # | 31 मार्च 2018 रोजी | 31 मार्च 2017 रोजी |
|---|---|---|
| भागभांडवल | 10,987.5 | 10,987.5 |
| राखीव व इतर निधी | 5,145.7 | 5,084.2 |
| तारणासहित कर्जे | 4,000.0 | 8,800.0 |
| तारणविरहित कर्जे | 40,706.0 | 39,477.8 |
| चालू दायित्वे | 39,339.8 | 28,089.8 |
| तारणासहित कर्जे | 4,800.0 | 3,263.7 |
| तारणविरहित कर्जे | 32,408.1 | 22,755.1 |
| इतर ( जमलेल कर्जांचे व्याज धरुन) | 2,131.7 | 2,071.0 |
| वलंबीत कर दायित्व (निव्वळ) | 378.5 | 511.7 |
| तरतूदी | 1,709.8 | 1,348.6 |
| एकूण | 102,267.3 | 94,299.5 |

(₹ दशलक्षामध्ये)

| मालमत्ता # | 31 मार्च 2018 रोजी | 31 मार्च 2017 रोजी |
|---|---|---|
| स्थिर मलमत्ता | 803.2 | 800.1 |
| गुंतवणूक | 2,610.5 | 1,060.3 |
| विलंबीत कर मालमत्ता | - | - |
| कर्ज | 88,223.0 | 81,043.6 |
| चालू मालमत्ता व अन्य कर्जे व अग्रिम | 10630.6 | 11,395.5 |
| किरकोळ खर्च (निर्लेखित करायच्या मर्यादेपर्यंत) | - | - |
| एकूण | 102,267.3 | 94,299.5 |

# मागिल वर्षातील आकड्यांचे एकत्रीकरण/पुन्हा वर्गीकरण गरजेनुसार केले आहे जे ह्या वर्षीच्या वर्गीकरण/खुलासाशी संबंधीत आहे.

(₹ दशलक्षामध्ये)

| आकस्मित दायित्वे | 31 मार्च 2018 रोजी | 31 मार्च 2017 रोजी |
|---|---|---|
| अपिलातल्या प्राप्ती कराबाबत | 416.3 | 416.3 |
| सर्विस टॅक्स बाबत | - | 0.7 |
| कंपनी विरूद्ध केलेले दावे पण ऋण मान्यता नाही | 8.8 | 11.2 |

(₹ दशलक्षामध्ये)

| सुविधा | 31 मार्च 2018 रोजी फंड बेस्टड आधार | 31 मार्च 2018 रोजी नॅन फंड बेस्टड आधार |
|---|---|---|
| समुहातील कंपनींना कर्ज | - | - |
| एकूण | - | - |
| समुहातील कंपनींकडून कर्ज | 5,298.1 | - |
| व्याज दर स्वॅप | - | 5,500.0 |
| एकूण | 5,298.1 | 5,500.0 |
| समुहातील कंपन्या/संबंधीत पक्षांना एकूण एक्सपोजर | 144.7 | - |
| समुहातील कंपन्या/संबंधीत पक्षांचे एकूण एक्सपोजर | 16,446.4 | 5,500.0 |

घ) हाऊसिंग फायनान्स (एनएचबी) मार्गदर्शक तत्वां 2010च्या नूसार कंपनी स्वतःच्या निधीच्या (नेट ओन्ड फंड) सोळा पटीपर्यंत कर्ज काढू शकते, ही रक्कम ₹ 254,138.7 दशलक्ष आहे, त्यापैकी सर्वजनिक ठेवी निव्वळ स्वःच्या निधीच्या 5 पटीपेक्षा ₹ 79,418.4 दशलक्षा पेक्षा अधिक असू नये. 31 मार्च 2018 रोजी कंपनीने केलेली सर्वजनिक ठेवीची एकूण रक्कम ₹ 2,517.9 दशलक्ष होती. दावा न केलेल्या ठेवींखेरीज कोणत्याही मुदतबाह्य ठेवी नाहीत.

ह) आम्ही घेषित करतो की, (1) कंपनीने तिला लागू असलेल्या मार्गदर्शक तत्वांतील तरतूदींचे पालन केले आहे. (2) मार्गदर्शक त्तवांचे पालन हे भारतीय रिझर्व्ह बँक व नॅशनल हाउसिंग बँक ह्याच्याद्वारे ठेवीच्या परतफेडीची हमी सूचित करीत नाही, आणि (3) कंपनी द्वारे स्वीकारल्या गेलेल्या ठेवी तारणरहित आहेत आणि त्या कंपनीच्या अन्य तारणरहित दायित्वांच्या तोलामोलाच्या आहेत.

वरिल मजकुराला संचालक मंडळाने दि. 19 एप्रिल 2018 रोजी भरवलेल्या त्यांच्या बैठकीत मान्यता दिलेली असून, तो कंपनीच्या संचालक मंडळाच्या अधिकारात व नावे जारी केला आहे, तसेच कंपनीच्या संचालकानी बहूमतांनी स्वाक्षरी केलेली त्याची प्रत नॅशनल हाउसिंग बँकेच्या दफ्तरी दाखल करण्यात आली आहे.

दिनांक : 19 एप्रिल 2018
स्थळ : मुंबई

संचालक मंडळाकरिता व वतीने
प्रताप सालीयन
कंपनी सेक्रेटरी